Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# आदिवासी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरुप

**धाये गणेश मधुकरराव**
संशोधक, संशोधन केंद्र
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना**

आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था इतर प्रगत समाजापेक्षा वेगळी आहे. प्रगत समानातील आर्थिक क्रियांचे स्वरुप आणि आदिवासी समाजातील आर्थिक क्रियांचे स्वरुप वेगळे आहे. आदिवासी समाजाता मालतेची संकल्पना वेगळी असते. प्रगत समानाप्रमाणेच बँक बॅलन्स, जमीन, प्लॉट अशी मालमत्ता त्यांच्याकडे नसते. आदिवासी समाजाच्या अर्थ व्यवस्थेचा विचार करता आदिवासींची अर्थव्यवस्था हो साधी अर्थव्यस्था आहे. त्यांना त्यांच्या निर्वाहविषयक गरजा निर्सगाच्या सानिध्यात राहून पूर्ण कराव्या लागतात. त्यांच्या आर्थिक क्रिया शेती, पशुपालन, मासेमारी इत्यादी स्वरुपाच्या असतात. त्यातूनच गरजांची पूर्तता केली जाते. आदिवासी समाजात गरजपूर्तीचे साधने कमी असतात. त्या साधनांचा वापर करुन आदिवासी लोक आपल्या गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. या स्वरुपाचे वैशिष्टचे पुढील प्रमाणे आहेत.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यापैकी प्रस्तुत शोध लेखासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. आदिवासी अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
२. आदिवासी समाजाच्या बदलत्या अर्थव्यवस्थेचा आढावा घेणे.

**आदिवासी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप**

**१. उदनिर्वाहप्रधान अर्थव्यवस्था**

आदिवासी समाजातील लोक उत्पादन करत असताना गरजपूर्तीचा विचार करुन उत्पादन करत असतात. उत्पादित मालाला बाजारपेठेत जास्तीचा भाव मिळाला पाहिजे असा हेतु त्यांच्याकडे नसतो. त्यांची संपूर्ण अर्थव्यवस्था उदनिर्वाहाशी संबंधित असते.

**२. साधनांचा अभाव**

आदिवासी जमातीमध्ये उत्पाधित साधनांचा अभाव असतो. कारण आदिवासी समाज पारंपारिक पध्दतीने शेती कसत असतात. शेती आवश्यक साधने ते स्वतःच बनवित असतात. यात भाला धनुष्य बाण, मासे पकडण्याचे झाळे इत्यादी साधनांच्या माध्यमातून व्यवसाय केला जातो. बाह्य जगाशी त्यांचा संदर्भ नसल्यामुळे त्यांच्याकडे प्रगत तंत्रज्ञानाचा प्रसार होऊ शकला नाही

**३. मर्यादित उत्पादन**

पारंपरिक पध्दतीने शेती केल्यामुळे त्यांच्या उत्पादनात भरघोष अशी वाढ होत नाही. व्यापारी तत्वावरील पिके घेण्याऐवजी गळीत धान्य, मासेमारी, कंदमुळे, फळे इत्यादी त्यांच्या अर्थव्यवस्थेची साधने आहेत. त्यामुळे उत्पादन मर्यादित असल्यामुळे उपजिविके पुरते पिके घेण्यावर त्यांचे लक्ष केंद्रीत झालेले असते.

**४. भांडवलाचा अभाव**

आदिवासी जमातीकडे नगदी पिकांचा तुटवडा असल्यामुळे त्यांच्याकडे भांडवलाचा तुडवडा असतो. त्यांना पेशांची गरज फारच कमी प्रमाणात पडते. कारण ते जास्त शिकार मिळाली तर ती दुस-याला शिकारीचा वाटा देऊन त्या बदल्यात त्यांच्याकडून फळे धान्य-फळे घेत असतात. त्यामुळेच आदिवासी समाजात प्रयत्न करुनही पतपेढ्या, बैंकाचा विकास होऊ शकला नाही.

**५. सामुदायिक जीवनावर भर**

आदिवासी समाजातील आर्थिक क्रिया एवढ्या कठिण असतात की, कोणताही एक व्यक्ती त्या आर्थिक क्रिया पार पाडू शकत नाही इतरांच्या सहकार्याशिवाय त्याला आर्थिक क्रिया पूर्ण करता येत नाहीत. उदा. शेती, शिकार, मासेमारी, पशुपालन इत्यादी सामुदायिक पध्दतीनेच करतात.

**६. बाजारपेठेचा अभाव**

आदिवासी जमाती गरजेपूर्तच उत्पादन घेत असल्यामुळे त्यांचा कल बाजारपेठेकडे नसतो. कारण ते जंगलातील फळे, कंदमुळे, मध, शिकार आणि मासेमारी करीत असल्यामुळे हा माल टिकावू नसतो. त्यामुळे आदिवासींना बाजारपेठेची आवश्यकता भासत नाही.

**७. लिंगावर आधारित श्रमविभाजनाला प्राधान्य**

आदिवासी समाजात कठिन कामे पुरुषांना दिली जातात तर नाजूक कामे महिलांना दिली जातात. महिला या जास्तीत जास्त घरकामे करीत असतात तर पुरुष शिकार, मासेमारी इत्यादी प्रकारची कामे करीत असतात. एकूणच श्रमविभाजनाचे लिंगावर आधारित साधे स्वरुप हे आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेचे खास वैशिष्ट्ये आहे.

**८. स्थिर अर्थव्यवस्था**

आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था कमालीची स्थिर असते. त्यांच्या अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारचं चढ़ किंवा उतार पहावयास मिळत नाहीत. पूर्वीपासूनच चालत आलेल्या त्यांच्या अर्थव्यवस्थेत फारसा बदल होन नाही. त्यांच्यात तंत्रविद्याचा वापर होत नसल्याने व बाह्य जगाशी फारसा संपर्क नसल्यामुळे आर्थिक स्वरुपातील बदलाची गती मंदच असते.

**९. दोरी गंडा आणि धर्माचा अर्थव्यवस्थेशी संबंध**

आदिवासी लोकांच्या आर्थिक जीवनावर धर्म आणि नादूचा प्रभाव पडलेला दिसून येतो. कारण त्यांचे राहणीमान जंगल दऱ्यात असल्यामुळे त्यांना अनेक संकटाचा सामना करावा लागतो. अशा असहाय्य परिस्थितीतून

सोपा मार्ग निधावा म्हणून आदिवासी लोक धर्मावर किंवा जादूवर विश्वास ठेवित असतात. जेव्हा जेंव्हा ते मासेमारी, शिकार, पेरणी किंवा इतर कामाला जातात तेंव्हा ते देवदेवतांची पूजा प्रथम करतात.

**१०. अनसकलनाला प्राधान्य**

निसर्गातील खाण्यास योग्य वस्तूचे संकलन करुन त्यावर उपजिविका भागविणे यास अन्नसंकलन म्हणता येईल. आदिवासी समाजातील हो एक प्रमुख आर्थिक क्रिया आहे. अगदी प्राचीन काळापासून आदिवासी जमाती अन्नसंकलनावर भर देत आले आहेत. आदिवासी जे अन्न संकलीत करीत असतात ते सर्वांमध्ये सारख्या प्रमाणात वाटल्या जाते.

**११. शिकार व मासेमारी करणे**

आदिवासी समाजामध्ये अन्न संकलनाप्रमाणे शिकार व मासेमारी ही दूसरी एक महत्त्वाची आर्थिक क्रिया आहे. हो आर्थिक क्रिया अन्न संकलन या आर्थिक क्रियेपेक्षा कांहीशी प्रगत आर्थिक क्रिया मानली जाते. अन्नसंकलन अवस्थेत काही वेळा एकटा आदिवासी सुध्दा अन्न संकलन करु शकत असायचा यामध्ये फळे गोळा करणे, डिक काटणे, मध काढणे, मासेमारी करणे आणि शिकार करणे इत्यादी कामे करीत.

**१२. पशुपालन करणे**

उंट, बेलाचा आणि गाढवाचा उपयोग आदिवासी लोक वाहतूकीसाठी, शेतीसाठी करु लागले. पशुकडे संपत्तीचा स्त्रोत म्हणून पाहिले जाते. भारतातील आदिवासी पशुपालनाच्या माध्यमातून उपजिविका भागवित आला आहे. आदिवासींच्या सर्वच जमातीमध्ये पशुपालनाला प्राधान्य दिले जाते. काही जमातीमध्ये पशुपालन मुख्य व्यवसाय आहे तर काही जमातीमध्ये दुय्यम व्यवसाय मानला जातो. पशुपालनावर उपजिविका भागविणाऱ्या आदिवासी जमातीत भटकंती आढळते. पर्शच्या चाऱ्यासाठी त्यांना भटकंती करावी लागते. तरीसुध्दा ते ठराविक क्षेत्रामध्येच भटकंती करतात.

**१३. स्थलांतरित शेती**

आदिवासी भागामध्ये स्थलांतरित शेती करण्यास पूर्वीपासूनच प्राधान्य दिले जाते. अशा शेतीसाठी आदिवासी लोक जमीनीवरील डोंगर उतारावरील झाडे साप करुन शेती करतात. काही कालावधी नंतर जमीनीचा पोत कमी झाल्यानंतर तेथील शेती सोडून दुसरीकडे नवीन शेती करतात यानाच स्थलांतरित शेती असे म्हणता येईल. भारतातील आसाम, नागालैंड, मेघालय, हिमाचल प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये अशा पध्दतीची शेती केली जाते.

**१४. हस्तकलेला प्राधान्य**

आदिवासी जमातीतील उत्पादनाच्या साधनामध्ये हस्तकलेला वरचे स्थान आहे. बांबूपासून चटया तयार करणे, दोरी वळणे, सूत कातणे, दोर वळणं, खेळाच्या वस्तू बनविणे, उत्तम विनकाम करणे अशा प्रकारची हस्तकला आदिवासी नमातीमध्ये आहे. पूर्व भारतातील अगारिया व कोरवा जमाती लोहकाम करण्यासाठी प्रसिध्द आहेत. इरुलाजमाती चटया करण्यासाठी प्रसिध्द आहेत. महाराष्ट्रातील फासे पारधी चित्तर पकडण्यासाठी चतुर आहेत. बाँदो जमातीचे लोक विणकाम करतात. थारु लोक वाद्ये वाजविणे व दोर वळण्याचे काम करतात. कोलाम लोक लाकडाची खेळणी तयार करतात.

**आदिवासी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरुप**

आदिवासींच्या पारंपारिक अर्थव्यवस्थेत जंगल संपत्ती हा एक महत्त्वाचा भाग होता. लाकूड तोडणे त्याची जाळून राख करुन ती राख जमिनीवर पसरवून शेती करणे, जळणास उपयुक्त अशा लहान लहान लाकडांची मोळी बांधून विकणे, जंगलातील प्राण्यांची शिकार करणे, डिंक गोळा करणे, मध गोळा करणं इत्यादी साधनांवर आदिवासीचा उदनिवाह चालत असे. परंतु ब्रिटिश काळात व स्वातंत्र्यानंतर वनविषयक कायद्यांनी आदिवासीच्या अर्थव्यवस्थेत परविर्तन झाले. १८७३ साली ब्रिटिशांनी भारतीय वन कायदा केला. या कायद्यांने आदिवासीच्या जंगलविषयक संबंधावर अनेक निबंध आले. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये जंगलविषयक धोरण ठरविण्यात आले. त्यानुसार बनाचे संवर्धन, वनसंशोधनावर भर दिला गेला. जंगलाचे नुकसान होऊ नये हे उद्दिष्ट ठरविले गेले. त्यामुळे आदिवासीच्या जंगलाशी संबंधित आर्थिक क्रियाचे स्वरुप बदलले. वृक्ष कापणी, शिकार करणे हे परंपरागत व्यवसाय त्यांना आता सोडून द्यावे लागले. शिकार करणे हे आदिवासीच्या उपजिविकेचे मुख्य साधन होते परंतु शिकारीला बंदी आणल्यामुळे त्यांना हा व्यवसाय साडून देण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. शिकार या व्यवसायावर अवलंबून असलेल्या आदिवासींचे पूर्ववरान करण्यासाठी शासन त्यांना शेतजमीन देत आहे. शेतीला कर्जपुरवठा करीत आहे. त्यामुळे शिकारी ऐवजी शेती कसण्यासाठी आदिवासीमध्ये परिवर्तन घडून येत आहे. प्राचीन काळापासून आदिवासी जमातीमध्ये स्थलांतरित शेती केली जात होती.

स्थलांतरित शेती करण्यासाठी दर वर्षी नवीन जंगलतोड करीत होते. शिवाय भरपूर श्रम करुनही उत्पादन कमी मिळत असे. यांचे कारण असे होते की, शेतीला नांगरणी नाही, खत नाहो, मशागत नाही इत्यादी कामे न केल्यामुळे ती जमीन लवकरच नापीक होत होती. परंतु जंगल तोड करुन शेती करण्यास शासनाने कायद्यानुसार बंदी घातलेली असल्यामुळे आदिवासीच्या समस्यात वाढ झाली आहे. त्यामुळे आदिवासीचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनातर्फे सुधारित शेतीचे महत्त्व आदिवासीना पटवून दिले जात आहे. यामुळे आदिवासी समाजाने स्थलांतरित शेती करण्याऐवजी स्थिर शेती करण्यास प्राधान्य दिले आहे. आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी लागणारे बि-बियाने, कृषी अवजारे आणि रासायनिक खतं पुरविली जात आहेत. याशिवाय वेगवेगळ्या कृषी अवजारावर सबसिडी आणि अनुदान दिले जात असल्यामुळे आदिवासीचा स्थिर व सुधारित शेती करण्यासाठो कल वाढला आहे. एवढेच नाही तर स्थिर शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मासेमारी, पशुपालन, कुटीर उद्योग, हस्तकलेला मोठ्या प्रमाणात वाव मिळत आहे. त्यामुळे आदिवासी समाज बाजार पेठेकडे आकर्षित झाला आहे. हा सकारात्मक बदल आदिवासीचा चेहरा-मोहरा बदलण्याकरिता क्रांतिकारी म्हणावा लागेल.

**सारांश**

उदनिर्वाहप्रधान अर्थव्यवस्था, साधनांचा अभाव, मर्यादित उत्पादन, भांडवलाचा अभाव, सामुदायिक जीवनावर भर, बाजारपेठेचा अभाव, लिंगावर आधारित श्रमविभाजनाला प्राधान्य, स्थिर अर्थव्यवस्था, दोरी गंडा आणि धर्माचा अर्थव्यवस्थेशी संबंध, सकलनाला प्राधान्य, शिकार व मासेमारी करणे, पशुपालन करणे, स्थलांतरित शेती आणि हस्तकलेला प्राधान्य इत्यादी आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्टे होती. परंतु शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, शासनाच्या विविध योजना व सवलती, कृषी बि-बियाणे, फळबाग, विविध गटे इत्यादींच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेचे सस्वरूप पूर्ण पणे बदलत असताना दिसून येत आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१. गारे गोविंद, पैनगंगा नदीच्या खो-यातील आदिवासी नमाती, श्री विद्याप्रकाशन, पुणे, २००१,
२. नागगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पूर्ण, १९७९
३. Dr.Revers, The ethane and cultural units in Tribes, Indian institute of Advanced study, Simla, 1969.
४. Hasnain Nadeem, Tribal India, Palaka Prakashan, Delhi, 1991
५. Bogards, The religion of the primitive Tribes, Asia Publishing House, New Delhi, 1934